Test Booklet Code & No.
प्रश्नपत्रिका कोड व क्र.

A

Paper-III
POLITICAL SCIENCE

Signature and Name of Invigilator

1. (Signature) .....

(Name) .....

2. (Signature) .....

(Name) .....

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. .....

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

MAY - 15316

Time Allowed : 2½ Hours] **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **48** Number of Questions in this Booklet : **75**

Instructions for the Candidates

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   Example : where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत **75** बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   उदा. : जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

POLITICAL SCIENCE
Paper III
राज्यशास्त्र
प्रश्नपत्रिका III

Time Allowed : 2½ Hours] **[Maximum Marks : 150**

Note : This Paper contains **Seventy Five (75)** multiple choice questions, each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

सूचना : या प्रश्नपत्रिकेत एकूण **पचहत्तर (75)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Which thinker triggered the resurgence of normative political theory ?

   (A) Antonio Gramsci

   (B) Harold Lasswell

   (C) Gabriel Almond

   (D) John Rawls

2. The liberal theory of social contract emphasizes the notion of :

   (A) Tradition

   (B) Force

   (C) Promise

   (D) Faith

1. कोणत्या विचारवंताने मूल्ययुक्त राजकीय सिद्धान्ताच्या पुनरुज्जीवनास चालना दिली ?

   (A) आंतोनियो ग्राम्शी

   (B) हेरल्ड लास्वेल

   (C) गॅब्रियल आल्मंड

   (D) जॉन रॉल्स

2. सामाजिक कराराचा उदारमतवादी सिद्धांत कशावर भर देतो ?

   (A) परंपरा

   (B) बल

   (C) वचन

   (D) श्रद्धा

3. Which of the following statements are *correct* ?

(*a*) The utilitarian understanding of justice focuses on rights

(*b*) The Marxist notion of justice emphasizes needs

(*c*) Some feminists suggest 'care' as an alternative to 'justice'

(*d*) The liberal approach to justice gives primacy to freedoms

Select the *correct* options from the following codes :

Codes :

(A) (*a*), (*b*) and (*c*)

(B) (*b*), (*c*) and (*d*)

(C) (*a*), (*c*) and (*d*)

(D) (*a*), (*b*) and (*d*)

3. खाली दिलेली कोणती विधाने बरोबर आहेत ?

(*a*) न्यायविषयक उपयुक्ततावादी आकलनाचा रोख अधिकारांवर आहे

(*b*) न्यायासंबंधीची मार्क्सवादी धारणा गरजांवर भर देते

(*c*) काही स्त्रीवादी 'न्याय' या संकल्पनेस 'जोपासना' हा पर्याय सुचवितात

(*d*) न्यायविषयक उदारमतवादी दृष्टिकोन स्वातंत्र्यास प्राधान्य देतो

खाली दिलेल्या संकेतांकामधून योग्य पर्याय निवडा :

संकेतांक :

(A) (*a*), (*b*) आणि (*c*)

(B) (*b*), (*c*) आणि (*d*)

(C) (*a*), (*c*) आणि (*d*)

(D) (*a*), (*b*) आणि (*d*)

4. Which of the following pairs is *incorrectly* matched ?

(A) Edmund Burke —Conservatism

(B) J.S. Mill —Liberalism

(C) F.A. Hayek —Socialism

(D) Emma Goldman —Anarchism

5. Which of the following is a distinctively Maoist strategy of change ?

(A) Cultural revolution

(B) Passive resistance

(C) Perestroika

(D) Permanent revolution

4. खाली दिलेल्या जोड्यांतील कोणती जोडी **चुकीची** आहे ?

(A) एडमंड बर्क – पुराणमतवाद

(B) जे.एस. मिल – उदारमतवाद

(C) एफ.ए. हायेक – समाजवाद

(D) एम्मा गोल्डमन – अराज्यवाद

5. परिवर्तनाची माओप्रणीत वैशिष्ट्यपूर्ण रणनीती कोणती ?

(A) सांस्कृतिक क्रांती

(B) अहिंसक प्रतिकार

(C) पेरेस्त्रोयका

(D) शाश्वत क्रांती

6. Which of the following is *not* a Leninist principle ?

(A) Vanguardism

(B) Democratic centralism

(C) Dictatorship of the proletariat

(D) Mass Line

7. Which of the following principles is central to Gandhian thought ?

(A) Rights

(B) Duties

(C) Sanctity of Law

(D) Secularism

6. लेनिनवादाच्या चौकटीत कोणते तत्त्व बसत **नाही** ?

(A) अग्रदलवाद (व्हँन्गार्डिझम)

(B) लोकशाही केंद्रवाद

(C) कामगारवर्गाची हुकूमशाही

(D) जनकेंद्री रणनीती (मास लाइन)

7. कोणते तत्त्व गांधीप्रणीत विचारांच्या केंद्रस्थानी आहे ?

(A) अधिकार

(B) कर्तव्ये

(C) कायद्याची शुचिता

(D) इहवाद

8. Which current of thought was *not* supported by M.N. Roy ?

(A) Materialism

(B) Idealism

(C) Democracy

(D) Rationalism

9. Which of the following pairs is not correctly matched (According to Plato) ?

(A) Appetite — Producing Class

(B) Spirit — Soldiers Class

(C) Reason — Ruling Class

(D) Wisdom — Bureaucratic Class

8. मानवेंद्रनाथ रॉय यांनी कोणत्या विचारधारेस पाठिंबा दिला **नाही** ?

(A) जडवाद

(B) चिद्‌वाद

(C) लोकशाही

(D) विवेकवाद

9. खालीलपैकी कोणती जोडी अयोग्य पद्धतीने जुळवण्यात आली आहे (प्लेटोच्या नुसार) ?

(A) भावना — उत्पादक वर्ग

(B) साहस — सैनिक वर्ग

(C) विवेक — शासक वर्ग

(D) शहाणपणा — नोकरशाही वर्ग

10. Who said the following statement 'In a democracy the poor have more power than the rich, because there are more of them and the will of the majority is supreme' ?

(A) Aristotle

(B) Plato

(C) Gandhi

(D) M.N. Roy

11. Which one of the following pairs is *not* correctly matched ?

(A) Thomas Hobbes — In the state of nature, profit is the measure of right

(B) John Locke — "Where there is no property, there is no injustice"

(C) Rousseau — Man is born free and everywhere he is in chains

(D) J.S. Mill — Virtue is knowledge

10. खालील वाक्य कोणी म्हटले आहे ?

'लोकशाही मध्ये श्रीमंताच्या तुलनेत गरीबांकडे जास्त सत्ता असते, कारण ते संख्येने जास्त असतात आणि बहुसंख्याकांची इच्छा सर्वउच्च असते.'

(A) ॲरिस्टॉटल

(B) प्लेटो

(C) गांधी

(D) एम.एन. रॉय

11. खालीलपैकी कोणती जोडी योग्यप्रकारे जुळवली **नाही** ?

(A) थॉमस हॉब्ज — निसर्ग अवस्थेमध्ये लाभ हेच मोजमापाचे परिमाण आहे

(B) जॉन लॉक — जेथे संपत्ती नसते, तेथे अन्याय नसतो

(C) रूसो — मनुष्य जन्म स्वतंत्र असतो आणि नंतर बंदिस्त होतो

(D) जे.एस. मिल — सदगुण म्हणजेच ज्ञान होय

12. Which one of the following pairs is not correctly matched ?

(A) Marx — Alienation from nature

(B) Marx — Alienation from humanity

(C) Marx — Alienation from himself

(D) Marx — Alienation from spirit

13. Which one of the following pairs is not correctly matched ?

(A) M.N. Roy — Rejected Marxism and accepted radical humanism

(B) M.N. Roy — Rejected party-less politics

(C) M.N. Roy — Rejected rational approach

(D) M.N. Roy — Rejected critical approach

12. खालीलपैकी कोणती जोडी अयोग्यप्रकारे जुळवली आहे ?

(A) मार्क्स – निसर्गापासूनचा परात्मभाव

(B) मार्क्स – मानवतेपासून परात्मभाव

(C) मार्क्स – स्व:पासून परात्मभाव

(D) मार्क्स – चैतन्यापासून परात्मभाव

13. खालीलपैकी कोणती जोडी अयोग्य पद्धतीने जुळवली आहे ?

(A) एम.एन. रॉय – मार्क्सवाद नाकाराला आणि मूलग्राही मानवतावाद स्वीकारला

(B) एम.एन. रॉय – पक्षविरहीत राजकारण नाकारले

(C) एम.एन. रॉय – विवेकी दृष्टिकोन नाकारला

(D) एम.एन. रॉय – समिक्षात्मक दृष्टिकोन नाकारला

14. Give the correct answer by using the codes given below :

(1) Hobbes — Natural Right

(2) Locke — Natural Right

(3) Rousseau — Natural Right

Codes :

(A) (1) and (3) are correct

(B) (2) and (3) are correct

(C) (1), (2) and (3) are correct

(D) (1) and (2) are correct

15. Who firstly propounded the theory of passive resistance ?

(A) M.K. Gandhi

(B) Aurobindo Ghosh

(C) M.K. Gandhi and Aurobindo Ghosh

(D) M.N. Roy

14. खाली दिलेल्या संकेत-सूचीचा वापर करून योग्य उत्तर द्या :

(1) हॉब्ज – निसर्गसिद्ध हक्क

(2) लॉक – निसर्गसिद्ध हक्क

(3) रूसो – निसर्गसिद्ध हक्क

संकेत-सूची :

(A) (1) आणि (3) बरोबर आहेत

(B) (2) आणि (3) बरोबर आहेत

(C) (1), (2) आणि (3) बरोबर आहेत

(D) (1) आणि (2) बरोबर आहेत

15. सविनय प्रतिकार सिद्धांत प्रथमत: कोणी मांडला ?

(A) एम.के. गांधी

(B) अरविंद घोष

(C) एम.के. गांधी आणि अरविंद घोष

(D) एम.एन. रॉय

16. Give the *correct* answer by using the codes given below :

According to M.N. Roy :

(1) The individual is prior to society

(2) The society is prior to individual

(3) The individual is prior to society and freedom can be enjoyed only by individuals

Codes :

(A) (1) is incorrect

(B) (2) is correct

(C) (2) is correct but (3) is incorrect

(D) (3) is correct

16. खाली दिलेल्या-संकेत सूचीचा वापर करून योग्य उत्तर द्या :

एम.एन. रॉय यांच्या मते :

(1) व्यक्ती समाजाअगोदर आहे

(2) समाज व्यक्तीच्या अगोदर आहे

(3) व्यक्ती समाजाच्या आधी आहे आणि स्वातंत्र्य केवल व्यक्तिकडून उपभोगले जाते

संकेत-सूची :

(A) (1) चूक आहे

(B) (2) बरोबर आहे

(C) (2) बरोबर आहे परंतु (3) हे चूक आहे

(D) (3) बरोबर आहे

17. Which among the following is an *incorrect* statement ?

(A) In Indian Constitutionalism has faced certain challenges

(B) The American Constitution is the first written and enacted Constitution

(C) The Swiss Constitution was drafted in 1948

(D) The British Constitution is partly written and partly unwritten

17. खालीलपैकी **अयोग्य** विधान ओळखा :

(A) भारतात राज्यघटनावादापुढे काही आव्हाने उभी राहिली होती

(B) अमेरिकेची राज्यघटना ही पहिली लिखित व तयार केलेली राज्यघटना आहे

(C) 1948 साली स्वित्झर्लंडची राज्यघटना तयार करण्यात आली

(D) ब्रिटनची राज्यघटना अंशत: लिखित व अंशत: अलिखित आहे

18. Select the *correct* answer by using the codes given below :

Assertion (A) : Judicial Review was not there in the American Constitution when it was drafted.

Reason (R) : In America Judicial Review began with the case of Marbury *Vs* Medison.

Codes :

(A) (A) is correct but (R) is incorrect

(B) Both (A) and (R) are correct but (R) is not the correct reason of (A)

(C) Both (A) and (R) are correct and (R) is the correct reason of (A)

(D) Both (A) and (R) are incorrect

18. खालील संकेत-सूचीचा वापर करून **योग्य** उत्तर द्या :

विधान (A) : अमेरिकेची राज्यघटना तयार केली गेली तेव्हा न्यायालयीन पुनर्विलोकन राज्यघटनेत समाविष्ट नव्हते.

कारण (R) : अमेरिकेत मार्बरी **विरूद्ध** मेडीसन खटल्यापासून न्यायालयीन पुनर्विलोकनाची सुरुवात झाली.

संकेत-सूची :

(A) (A) हे योग्य आहे, परंतु (R) हे अयोग्य आहे

(B) दोन्ही (A) व (R) योग्य आहे, परंतु (R) हे (A) चे योग्य कारण नाही

(C) दोन्ही (A) व (R) योग्य आहे, आणि (R) हे (A) चे योग्य कारण आहे

(D) दोन्ही (A) व (R) हे अयोग्य आहेत

19. In which of the following states the principle of equal representation to Upper House is not followed ?

(A) USA

(B) Switzerland

(C) India

(D) Australia

20. Which among the following pairs is not correctly matched ?

(A) USA — Judicial Review

(B) UK — Constitutional Monarchy

(C) France — Parliamentary Government

(D) Switzerland — Collegiate Executive

19. खालीलपैकी कोणत्या देशात प्रत्येक घटक राज्याला वरिष्ठ सभागृहात समान प्रतिनिधीत्व हे तत्त्व अवलंबिलेले नाही ?

(A) अमेरिका

(B) स्वित्झर्लंड

(C) भारत

(D) ऑस्ट्रेलिया

20. खालीलपैकी अयोग्य जोडी ओळखा :

(A) अमेरिका – न्यायालयीन पुनर्विलोकन

(B) युनायटेड किंगडम – घटनात्मक राजेशाही

(C) फ्रान्स – संसदीय शासन

(D) स्वित्झर्लंड – सांघीक कार्यकारी मंडळ

21. Select the *correct* answer by using the codes given below :

(1) American Constitution was drafted at Philadelphia

(2) Bill of Rights was incorporated in the American Constitution with first 10 Amendments

(3) The heads of the Federating units in US (Governors) are appointed by the President

Codes :

(A) (1) and (3) are correct, (2) is incorrect

(B) (1) and (2) are correct, (3) is incorrect

(C) (1) is correct, (2) and (3) are incorrect

(D) (2) is correct, (1) and (3) are incorrect

21. खाली दिलेल्या संकेत-सूचीचा वापर करून योग्य उत्तर ओळखा :

(1) अमेरिकेची राज्यघटना फिलाडेल्फिया येथे तयार करण्यात आली

(2) पहिल्या दहा घटनादुरुस्तीद्वारे अमेरिकेच्या राज्यघटनेत हक्कांची सनद समाविष्ट करण्यात आली

(3) अमेरिकेतील घटक राज्यांच्या प्रमुखांची (राज्यपाल) नियुक्ती राष्ट्रपतींकडून केली जाते

संकेत-सूची :

(A) (1) आणि (3) योग्य आहे, (2) अयोग्य आहे

(B) (1) आणि (2) योग्य आहे, (3) अयोग्य आहे

(C) (1) योग्य आहे, (2) आणि (3) अयोग्य आहे

(D) (2) योग्य आहे, (1) आणि (3) अयोग्य आहे

22. Who defined Political system in terms of "Authoritative allocation of values" ?

(A) Gabriel Almond

(B) David Easton

(C) G.B. Powell

(D) Jean Blondel

23. Select the correct answer by using the codes given below :

Assertion (A) : China has adopted Constitutionalism.

Reason (R) : Chinese people enjoy all democratic rights.

Codes :

(A) (A) is correct but (R) is incorrect

(B) Both (A) and (R) are correct but (R) is not the correct reason of (A)

(C) Both (A) and (R) are correct and (R) is the correct reason of (A)

(D) Both (A) and (R) are incorrect

22. 'अधिकारयुक्त मूल्यांचे वितरण' अशा शब्दात राजकीय व्यवस्थेची व्याख्या कोणी केली ?

(A) गॅब्रिअल आल्मंड

(B) डेवीड ईस्टन

(C) जी.बी. पॉवेल

(D) जीन ब्लॉंडेल

23. खाली दिलेल्या संकेत-सूचीचा वापर करून योग्य उत्तर ओळखा :

विधान (A) : चीन ने राज्यघटनावादाचा स्वीकार केला आहे.

कारण (R) : चीनी जनता सर्व प्रकारचे लोकशाही हक्क उपभोगते.

संकेत-सूची :

(A) (A) हे योग्य आहे, परंतु (R) हे अयोग्य आहे

(B) दोन्ही (A) व (R) योग्य आहे, परंतु (R) हे (A) चे योग्य कारण नाही

(C) दोन्ही (A) व (R) योग्य आहे, आणि (R) हे (A) चे योग्य कारण आहे

(D) दोन्ही (A) व (R) हे अयोग्य आहेत

24. Match List I with List II and select the correct answer from the codes given below :

List I

(Authors)

(*a*) David Apter

(*b*) Samuel Huntington

(*c*) Paul Baran

(*d*) C.E. Black

List II

(Books)

(1) The Dynamics of Modernization

(2) The Politics of Modernization

(3) Political Order in Changing Societies

(4) The Political Economy of Growth

Codes :

	(*a*)	(*b*)	(*c*)	(*d*)
(A)	(1)	(2)	(3)	(4)
(B)	(2)	(3)	(4)	(1)
(C)	(3)	(4)	(1)	(2)
(D)	(4)	(1)	(2)	(3)

24. सूची I आणि सूची II मधील घटकांच्या जोड्या जुळवा व त्यासाठी सोबतच्या संकेत-सूचीचा वापर करा :

सूची I

(लेखक)

(*a*) डेवीड ॲप्टर

(*b*) सॅम्युअल हंटिंग्टन

(*c*) पॉल बॅरन

(*d*) सि.इ. ब्लॅक

सूची II

(पुस्तक)

(1) द डायनॅमिक्स ऑफ मॉडर्नायझेशन

(2) द पॉलिटीक्स ऑफ मॉडर्नायझेशन

(3) पॉलिटीकल ऑर्डर इन चेंजिंग सोसायटीज

(4) द पॉलिटीकल इकॉनॉमी ऑफ ग्रोथ

संकेत-सूची :

	(*a*)	(*b*)	(*c*)	(*d*)
(A)	(1)	(2)	(3)	(4)
(B)	(2)	(3)	(4)	(1)
(C)	(3)	(4)	(1)	(2)
(D)	(4)	(1)	(2)	(3)

25. Democratic Socialism is a modern version of :

(A) Syndicalism

(B) Marxian Socialism

(C) Guild Socialism

(D) Fabian Socialism

26. Match the List I with List II and select the correct answer from the codes given below :

List I

(*a*) Lucian Pye

(*b*) David Apter

(*c*) C. Wright Mills

(*d*) Max Weber

List II

(1) Elite theory

(2) Political Development

(3) Authority

(4) Political Modernization

Codes :

	(*a*)	(*b*)	(*c*)	(*d*)
(A)	(1)	(3)	(4)	(2)
(B)	(2)	(4)	(1)	(3)
(C)	(3)	(1)	(4)	(2)
(D)	(2)	(1)	(4)	(3)

25. लोकशाही सामाजिकीकरण हे कशाचे आधुनिक रूप आहे ?

(A) कामभार संघटनावाद

(B) मार्क्सवादी समाजवाद

(C) गिल्ड समाजवाद

(D) फेबियन समाजवाद

26. खालील संकेत-सूचीचा वापर करून यादी I व यादी II मधील योग्य जोड्या जुळवा :

यादी I

(*a*) लुसियन पाय

(*b*) डेविड ॲप्टर

(*c*) सि. राईट मिल्स

(*d*) मॅक्स वेबर

यादी II

(1) अभिजन सिद्धान्त

(2) राजकीय विकास

(3) अधिसत्ता

(4) राजकीय आधुनिकीकरण

संकेत-सूची :

	(*a*)	(*b*)	(*c*)	(*d*)
(A)	(1)	(3)	(4)	(2)
(B)	(2)	(4)	(1)	(3)
(C)	(3)	(1)	(4)	(2)
(D)	(2)	(1)	(4)	(3)

27. Who said the following ?

"The 20th century totalitarianism represents an onion like structure".

(A) Karl Popper

(B) Hannah Arendt

(C) Raymond Aron

(D) Michael Oakeshott

28. Which among the following is incorrectly matched ?

(A) A Critique of Elitist theory — Walker

(B) Liberalism and Social Action — Dewey

(C) Equilibrium Democracy — Macpherson

(D) Freedom, Power and Democratic Planning — Mannheim

27. ''20व्या शतकातील सर्वंकषशाहीची रचना कांद्या सारखी आहे.'' असे कोण म्हणाले ?

(A) कार्ल पॉपर

(B) हॅना ॲरंडट

(C) रेमंड ॲरन

(D) मिखाईल ओकशॉट

28. खालीलपैकी अयोग्य जोडी ओळखा :

(A) अ क्रिटीक ऑफ एलीटिस्ट थिअरी — वॉकर

(B) लिबरॅलिझम ॲन्ड सोशल ॲक्शन — डुआी

(C) इक्विलिब्रिअम डेमॉक्रसी — मॅकफरसन

(D) फ्रिडम, पॉवर ॲन्ड डेमॉक्रॅटीक प्लॅनिंग — मॅनहीम

29. Who propounded the "iron law of oligarchy" in the study of Political Elites ?

(A) Michels, R

(B) Mills C.W.

(C) Duverger, M

(D) La Palombara, J

30. What are the four kinds of logic according to new cultural theory value of orientations ?

(A) Fatalism, morals, individualism, egalitarianism

(B) Morals, traditions, hierarchy, egalitarianism

(C) Fatalism, hierarchy, individualism, egalitarianism

(D) Morals, fatalism, hierarchy, individualism

29. राजकीय अभिजनांच्या अभ्यासासाठी ''धनिकांचा पोळादी कायदा'' कोणी मांडला ?

(A) आर. मिशेल्स

(B) सि.डब्ल्यू. मिल्स

(C) एम. दुवरजर

(D) जे.ला. पालोंबरा

30. नवसांस्कृतिक सिद्धान्ताच्या मूल्याभिमुखतेचे कोणते चार तर्क आहेत ?

(A) दैववाद, नीती, व्यक्तिवाद, समतावाद

(B) नीती, परंपरा, पदसोपान, समतावाद

(C) दैववाद, पदसोपान, व्यक्तिवाद, समतावाद

(D) नीती, दैववाद, पदसोपान, व्यक्तिवाद

31. Criterion for regional party to be recognized as a national party is :

(A) To be recognized in at least 3 states

(B) To be recognized in 4 states

(C) To get 1/10th of seats in Lok Sabha

(D) To get 1/10th of seats in Parliament

32. In case the office of both the Speaker and the Dy. Speaker of the Lok Sabha become vacant, who will preside over the meeting of the House ?

(A) Seniormost member of the Lok Sabha

(B) The first member of the Penal of Chairpersons approved by the House

(C) A member designated by the President

(D) A member nominated by the House

31. प्रादेशिक पक्षाला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळण्यासाठी कोणत्या अटीची पूर्तता होणे आवश्यक असते ?

(A) किमान तीन राज्यात मान्यता मिळणे

(B) किमान चार राज्यात मान्यता मिळणे

(C) लोकसभेच्या किमान 1/10 जागा मिळणे

(D) संसदेच्या किमान 1/10 जागा मिळणे

32. जर लोकसभेच्या सभापती व उपसभापतींचे पद रिक्त असेल, तर सभागृहाच्या बैठका कोणाच्या अध्यक्षतेखाली होतात ?

(A) लोकसभेचा सर्वात जेष्ठ सदस्य

(B) सभागृहाने मान्य केलेल्या अध्यक्षांच्या यादीतील सर्वात प्रथम सदस्य

(C) राष्ट्रपतींनी निर्दिष्ट केलेला सदस्य

(D) सभागृहाने नियुक्त केलेला सदस्य

33. Which of the following committee recommended that the election to Panchayat Raj bodies should be held on Party lines ?

(A) Dar Committee

(B) Balwant Rai Mehta Committee

(C) Ashok Mehta Committee

(D) V.K.R.V. Rao Committee

34. Fundamental Rights guaranteed in the Indian Constitution can be suspended by :

(A) An act passed by Parliament

(B) An amendment of the Constitution

(C) A proclamation of National Emergency

(D) The judicial decision of the Supreme Court

33. पंचायती राज संस्थांच्या निवडणूका पक्षीय व्हाव्यात अशी शिफारस कोणत्या समितीने केली ?

(A) दार समिती

(B) बलवंतराय मेहता समिती

(C) अशोक मेहता समिती

(D) व्हि.के.आर.व्ही राव समिती

34. भारतीय राज्यघटनेने बहाल केलेले मूलभूत हक्क कशा पद्धतीने स्थगित करता येतात ?

(A) संसदेच्या कायद्यान्वये

(B) राज्यघटनेच्या दुरुस्तीद्वारे

(C) राष्ट्रीय आणीबाणी लागू करून

(D) सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाद्वारे

35. One of the following statements is incorrect :

(A) Governor of a State is appointed by the President of India

(B) There is no bar to the selection of a Governor

(C) Any citizen of India over 30 years of age is eligible for the office

(D) There is no bar to a person being appointed Governor more than once

36. The Constitution of India does *not* mention post of :

(A) Deputy Chairman of Rajya Sabha

(B) The Deputy Prime Minister

(C) The Deputy Speaker of the Lok-Sabha

(D) The Deputy Speaker of Legislative Assemblies

35. खालीलपैकी चुकीचे विधान ओळखा :

(A) राज्याच्या राज्यपालांची नेमणूक भारताच्या राष्ट्रपतींकडून केली जाते

(B) राज्यपालांच्या नियुक्तिसंबंधी कोणताही अडसर नसतो

(C) वयाची 30 वर्षे पुर्ण केलेला कोणताही भारतीय नागरिक या पदासाठी पात्र असतो

(D) कोणत्याही व्यक्तिला एकापेक्षा अधिक वेळा राज्यपाल म्हणून नियुक्त करण्यासाठी कोणताही अडसर नसतो

36. भारताच्या राज्यघटनेमध्ये खालीलपैकी कोणत्या पदाचा उल्लेख **नाही** ?

(A) राज्यसभेचे उपाध्यक्ष

(B) उपपंतप्रधान

(C) लोकसभेचे उपसभापती

(D) राज्य विधिमंडळाचे उपसभापती

37. Which of the following group constituted the State Reorganization Commission ?

(A) Panikkar, Fazil Ali, Katju

(B) Kunzru, Katju, Dhar

(C) Fazil Ali, Panikkar, Kunzru

(D) Dhar, Fazil Ali, Katju

38. Consider the following statements and select the correct answer by using the codes given below :

(1) A Bill returned by the President for reconsideration does not lapse on the dissolution of the Lok Sabha

(2) A Bill passed by the Lok Sabha and pending in Rajya Sabha on the dissolution of the Lok Sabha does not lapse

(3) A Bill under consideration of the Lok Sabha lapses when the Lok Sabha is dissolved

(4) A Bill originating in the Rajya Sabha, which has not been passed by the Lok Shabha and which is still pending in the Rajya Sabha does not lapse

Codes :

(A) (3) and (4) only

(B) (1) and (2) only

(C) (1), (2) and (4) only

(D) (2), (3) and (4) only

37. खालीलपैकी कोणता गट राज्य पुनर्रचना आयोगात कार्यरत होता ?

(A) पनिक्कर, फाझिल अली, काटजू

(B) कुंझरू, काटजू, दार

(C) फाझिल अली, पनिक्कर, कुंझरू

(D) दार, फाझिल अली, काटजू

38. खालील विधानामधील बरोबर उत्तर ओळखण्यासाठी संकेत-सूचीचा वापर करा :

(1) राष्ट्रपतींनी पुनर्विचारासाठी पाठविलेले विधेयक लोकसभा विसर्जित झाली तरी रद्द होत नाही

(2) एखादे विधेयक लोकसभेत मंजूर केले व ते राज्य सभेत अनिर्णित असेल व अशा परिस्थितीत लोकसभा बरखास्त झाली तर ते विधेयक रद्द होत नाही

(3) लोकसभेच्या विचारार्थ असलेले विधेयक लोकसभा विसर्जित झाल्यावर रद्द होते

(4) एखादे राज्यसभेत सादर झालेले विधेयक लोकसभेकडून संमत झाले आणि राज्यसभेत अनिर्णित अवस्थेत असेल तर रद्द होत नाही

संकेत-सूची :

(A) (3) आणि (4) बरोबर आहे

(B) (1) आणि (2) बरोबर आहे

(C) (1), (2) आणि (4) बरोबर आहे

(D) (2), (3) आणि (4) बरोबर आहे

39. Given below are two statements, one labeled as Assertion (A) and the other labelled as Reason (R) :

Assertion (A) : Secularism is a basic feature of the Constitution of India in the sense that state should be neutral to the different religions

Reason (R) : One of the Directive Principles of States Policy states that it will be a part of the duty of the state to improve the breeds of the cattle and stop the slaughter of cows and calves.

In the context of the above two statements one of the following is *correct* :

Codes :

(A) Both (A) and (R) are true but (R) is not the correct explanation of (A)

(B) (A) is true but (R) is false

(C) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanation of (A)

(D) (A) is false but (R) is true

39. खाली दोन विधाने दिले आहेत त्यापैकी एक विधान (A) व एक कारण (R) आहे :

विधान (A) : धर्मनिरपेक्षता हे भारतीय राज्यघटनेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे म्हणजेच राज्याने विविध धर्मांबाबत नि:पक्षपाती भूमिका घेतली पाहिजे.

कारण (R) : राज्याच्या धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांमधील एक तत्त्व असे म्हणते की राज्य दुभत्या जनावरांची योग्य पैदास करण्यासाठी प्रयत्न करेल आणि गाय व वासरांची कत्तल रोखले.

वरील दोन विधानांच्या संदर्भात खालीलपैकी योग्य पर्याय लिहा :

संकेतांक :

(A) दोन्ही (A) व (R) बरोबर आहे, पण (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही

(B) (A) हे बरोबर आहे, परंतु (R) हे चूक आहे

(C) दोन्ही (A) व (R) बरोबर आहे आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे

(D) (A) हे चूक आहे, पण (R) हे बरोबर आहे

40. In case of declaration of Financial Emergency in India ..... .

(A) All Money Bills of the state will be considered and passed only by the President

(B) All the states government will be dissolved and managements of economy will be taken over by Union Government

(C) All the state assemblies will be put under suspended animation and laws on the state list will be enacted by the Parliament

(D) The President may give such direction to the states as may be deemed necessary for economic recovery and salaries of officials may be temporarily reduced

41. Who wrote the book 'The Dominant Caste and Other Essays' ?

(A) M.N. Srinivas

(B) N. Jose Chander

(C) Rajni Kothari

(D) Ghanshyam Shah

40. जेव्हा भारतात आर्थिक आणीबाणी लागू केली जाते तेव्हा ..... .

(A) राज्याची सर्व वित्त विधेयके राष्ट्रपतीकडे विचारार्थ पाठविली जातील व केवळ त्यांच्याकडूनच संमत केली जातील

(B) सर्व राज्यसरकारे बरखास्त केली जातील व त्यांच्या आर्थिक व्यवस्थापनाची जबाबदारी केंद्र सरकारकडून घेतली जाईल

(C) सर्व घटक राज्यांच्या विधानसभा बरखास्त केल्या जातील आणि राज्य सूचीतील विषयांवर संसदेकडून कायदे केले जातील

(D) आर्थिक अरिष्टावर मात करण्यासाठी आवश्यक अशा सूचना राष्ट्रपती राज्यांना देतील आणि काही काळासाठी अधिकाऱ्यांचे पगार कमी केले जातील

41. 'द डॉमिनेन्ट कास्ट ॲन्ड अदर एसेज्' हे पुस्तक कोणी लिहिले ?

(A) एम.एन. श्रीनिवास

(B) एन.जोस. चंदर

(C) रजनी कोठारी

(D) घनश्याम शहा

42. Give the correct answer by using the codes given below :

Assertion (A) : The dalits not only belong to the lower caste category but also belong to the lower class category of the Indian society.

Reason (R) (I) : Dalits are mainly poor peasants

(II) : Dalits are agricultural labourers in the rural economy

(III) : In the urban economy dalits basically form the bulk of the labouring population.

Codes :

(A) (A) is correct but (R) (I) is incorrect

(B) (A) is correct but (R) (II) is incorrect

(C) (A) is correct but (R) (III) is incorrect

(D) (A) is correct but (R) (I), (R) (II) and (R) (III) are also correct

42. खाली दिलेल्या संकेत-सूचीचा वापर करून योग्य उत्तर द्या :

विधान (A) : दलित हे भारतीय समाजाच्या जातीय उतरंडीमध्ये निम्न स्तरावर आहेत, तसेच ते या समाजाच्या वर्गीय उतरंडी-मध्ये निम्न स्तरावर आहेत.

कारण (R) (I) : दलित मुख्य: गरीब शेतकरी आहेत

(II) ग्रामीण अर्थकारणात शेतमजूर दलित आहेत

(III) शहरी अर्थकारणात दलित मुख्य: मोठ्या संख्येने कामगार लोकसंख्या आहे.

संकेत-सूची :

(A) (A) बरोबर आहेत, परंतु (R) (I) चूक आहे

(B) (A) बरोबर आहे, परंतु (R) (II) चूक आहे

(C) (A) बरोबर आहेत, परंतु (R) (III) चूक आहे

(D) (A) बरोबर आहेत, परंतु (R) (I), (R) (II) आणि (R) (III) बरोबर आहेत

43. Which one of the following pairs is correctly matched ?

(A) Dominant Party System — 1952-1967

(B) Two-party System — 1990-1999

(C) Multiparty Coalition — 1952-1967

(D) One Party Dominance — 2004-2014

44. Which one of the following pairs is *not* correctly matched ?

(A) Party Systems theory — The social cleavage theory

(B) Party Systems theory — The electoral rules theory

(C) Party Systems theory — Fragmentation of the party system

(D) Party System theory — The non-social cleavage theory

43. खालीलपैकी कोणती जोडी योग्य प्रकारे जुळवली आहे ?

(A) प्रभुत्वशाली पक्ष पद्धती — 1952-1967

(B) द्विपक्ष पद्धती — 1990-1999

(C) बहुपक्ष पद्धती — 1952-1967

(D) प्रभुत्वशाली एकपक्ष पद्धती — 2004-2014

44. खालीलपैकी कोणती जोडी योग्यप्रकारे जुळवली **नाही** ?

(A) पक्षपद्धती सिद्धांत — सामाजिक अंतराय सिद्धांत

(B) पक्षपद्धती सिद्धांत — निवडणूक नियम सिद्धांत

(C) पक्षपद्धती सिद्धांत — पक्षीय व्यवस्थेचे विखंडन

(D) पक्षपद्धती सिद्धांत — बिगर-सामाजिक अंतराय सिद्धांत

45. Which Amendment empowered the Gram Sabhas to conduct social audits ?

(A) 72nd Amendment

(B) 73rd Amendment

(C) 74th Amendment

(D) 75th Amendment

46. Which one of the following pairs is *not* correctly matched ?

(A) Single Party System — Punjab

(B) Two-party System — Rajasthan

(C) Multi-party System — Maharashtra

(D) Two-party System — Madhya Pradesh

45. सामाजिक ऑडिट करून ग्रामसभांना सबल करण्यासाठी कोणती घटनादुरुस्ती करण्यात आली ?

(A) 72वी घटनादुरुस्ती

(B) 73वी घटनादुरुस्ती

(C) 74वी घटनादुरुस्ती

(D) 75वी घटनादुरुस्ती

46. खालीलपैकी कोणती जोडी योग्यप्रकारे जुळवली **नाही** ?

(A) एकपक्ष पद्धती – पंजाब

(B) द्विपक्ष पद्धती – राजस्थान

(C) बहुपक्ष पद्धती – महाराष्ट्र

(D) द्विपक्ष पद्धती – मध्यप्रदेश

47. Which of the following is *not* Electoral Reforms Committees ?

(A) Jaya Prakash Narayan Committee

(B) Tarkunde Committee

(C) Goswami Committee

(D) Morris Jones Committee

48. According to Luther Gulick 'POSDCORB' stands for the following. Choose the *correct* answer :

(A) Planning, Organising, Selecting, Directing, Coordinating, Reporting, Budgeting

(B) Planning, Organising, Selecting, Decentralising, Coordinating, Reporting, Budgeting

(C) Planning, Organising, Staffing, Directing, Coordinating, Reporting, Budgeting

(D) Planning, Organising, Staffing, Directing, Coordinating, Regularising, Budgeting

47. निवडणूक सुधारणा समिती पुढीलपैकी कोणती **नाही** ?

(A) जय प्रकाश नारायण समिती

(B) तारकुंडे समिती

(C) गोस्वामी समिती

(D) मॉरिस जोन्स समिती

48. ल्यूथर ग्युलिकच्या मते POSDCORB म्हणजे काय ?

(A) नियोजन, संघटन, निवड, निदेशन, समन्वय, प्रतिवेदन, अर्थसंकल्पन

(B) नियोजन, संघटन, निवड, विकेंद्रीकरण, समन्वय, प्रतिवेदन, अर्थसंकल्पन

(C) नियोजन, संघटन, कर्मचारी प्रबंधन, निदेशन, समन्वय, प्रतिवेदन, अर्थसंकल्पन

(D) नियोजन, संघटन, कर्मचारी प्रबंधन, निदेशन, समन्वय, नियमित करणे, अर्थसंकल्पन

49. Who said this "Staff and Line are coordinators operating not in a hierarchical relation to staff over line, but on a horizontal plane of authority and responsibility under the Chief Executive" ?

(A) Albert Lepawsky

(B) Dimock and Dimock

(C) Oliver Sheldon

(D) Pfiffner and Presthus

50. Who said 'bureaucracy refers to a system of government, the control of which is so completely in the hands of officials that their power Jeopardises the liberties of ordinary citizens' ?

(A) Harold Laski

(B) Max Weber

(C) Paul Thompson

(D) Davis Osborne

49. ''रेषा आणि पंक्ती हे समन्वयक असून पंक्तीचे रेषेवर वर्चस्व नसते. किंबहुना त्यांचे कार्य समान अधिसत्ता-पातळीवर, समान जबाबदारीने मुख्य कार्याधिकाऱ्याच्या देखरेखी खाली चालते.'' हे विधान कोणी केले ?

(A) आल्बर्ट लेपॉस्की

(B) डिमॉक आणि डिमॉक

(C) ऑलिव्हर शेल्डन

(D) पिफनर आणि प्रेस्थस

50. 'नोकरशाही ही अशी शासनपद्धती आहे की जिचे नियंत्रण अधिकारी वर्गाच्या हातात एवढ्या प्रमाणात एकवटलेले असते की त्यांच्या प्राबल्यामुळे सामान्य नागरिकांच्या स्वातंत्र्यास धोका पोहोचतो.' हे विधान कोणी केले ?

(A) हेरल्ड लास्की

(B) मॅक्स वेबर

(C) पॉल थॉम्पसन

(D) डेव्हिड ओसबॉर्न

51. Match List I with List II and select the correct answer from the codes given below the list :

List I

(*a*) UPSC

(*b*) SSC

(*c*) NITI Aayog

(*d*) Election Commission

List II

(1) Constitutional Body

(2) Social Justice

(3) 1975

(4) Article 324

Codes :

	(*a*)	(*b*)	(*c*)	(*d*)
(A)	(1)	(2)	(3)	(4)
(B)	(4)	(2)	(3)	(1)
(C)	(1)	(3)	(2)	(4)
(D)	(4)	(3)	(2)	(1)

51. खाली दिलेल्या संकेत-सूचीच्या साहाय्याने यादी I व यादी II यांच्या जोड्या लावा :

सूची I

(*a*) यु.पी.एस.सी.

(*b*) एस.एस.सी.

(*c*) नीती आयोग

(*d*) निवडणूक आयोग

सूची II

(1) घटनात्मक संस्था

(2) सामाजिक न्याय

(3) 1975

(4) कलम 324

संकेत-सूची :

	(*a*)	(*b*)	(*c*)	(*d*)
(A)	(1)	(2)	(3)	(4)
(B)	(4)	(2)	(3)	(1)
(C)	(1)	(3)	(2)	(4)
(D)	(4)	(3)	(2)	(1)

52. The team appointed for the study of Community Project and Natural Extension Services in known as :

(A) Asoka Mehta Committee

(B) Kothari Committee

(C) Balvant Rai Mehta Committee

(D) Shah Committee

53. Which one of the following statements is incorrect about the functions of Finance Commission ?

(A) Recommend distribution between the Union and the State of the net proceeds of taxes

(B) The principles to govern the grants-in-aid

(C) Matter referred by the President in the interest of sound finance

(D) To supervise the Planning Commission

52. सामूहिक प्रकल्प (कम्यूनिटी प्रोजेक्टस्) व राष्ट्रीय विस्तार सेवा यांचा अभ्यास करण्यासाठी स्थापन केलेला गट कोणता ?

(A) अशोक मेहता समिती

(B) कोठारी समिती

(C) बलवंतराय मेहता समिती

(D) शहा समिती

53. वित्त आयोगाच्या कार्यांसंबंधीच्या खाली दिलेल्या विधानांतील कोणते विधान चूक आहे ?

(A) कररूपाने गोळा झालेल्या निव्वळ निधीचे केंद्र व राज्ये यांमध्ये वितरण करणे

(B) सहायक अनुदानाविषयीची तत्त्वे

(C) सुयोग्य वित्तव्यवस्थापनासाठी राष्ट्रपतींच्या अभिप्रायार्थ पाठविलेली बाब

(D) नियोजन आयोगावर देखरेख ठेवणे

54. The 73rd Amendment Act is *not* applicable to which of the following states ?

(A) Nagaland, Tripura and Assam

(B) Mizoram, Nagaland and Jammu and Kashmir

(C) Meghalaya, Tripura and Jammu and Kashmir

(D) Jharkhand, Nagaland and Jammu and Kashmir

55. Who had created the office of Collector at the district level ?

(A) Lord Ripon

(B) Lord Curzon

(C) Robert Clive

(D) Warren Hastings

54. 73वी घटनादुरुस्ती खाली दिलेल्या कोणत्या राज्यांना लागू **नाही** ?

(A) नागालँड, त्रिपुरा आणि आसाम

(B) मिझोराम, नागालँड व जम्मू आणि काश्मीर

(C) मेघालय, त्रिपुरा व जम्मू आणि काश्मीर

(D) झारखंड, नागालँड व जम्मू आणि काश्मीर

55. जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी हे पद कोणी स्थापन केले ?

(A) लॉर्ड रिपन

(B) लॉर्ड कर्झन

(C) रॉबर्ट क्लाइव्ह

(D) वॉरन हेस्टिंग्ज

56. Who said that real significance of the budget system lies in providing for the orderly administration of the financial affairs of a government ?

(A) Paul Appleby

(B) W.F. Willoughby

(C) Kautilya

(D) Harold Smith

57. Who said 'Red tape' is the cult of administrative procedure ?

(A) Dwight Waldo

(B) L.D. White

(C) Max Weber

(D) Paul Appleby

56. 'शासनाच्या वित्तीय व्यवहाराचे सुयोग्य प्रशासन सुकर करण्यात अर्थसंकल्प व्यवस्थेचे खरे महत्त्व दडलेले आहे' हे विधान कोणी केले ?

(A) पॉल ॲपल्बी

(B) डब्ल्यू.एफ. विलोबी

(C) कौटिल्य

(D) हेरल्ड स्मिथ

57. 'दफ्तर दिरंगाई हे प्रशासकीय कार्यपद्धतीचे स्तोम आहे' हे विधान कोणी केले ?

(A) ड्वाइट वाल्डो

(B) एल.डी. व्हाइट

(C) मॅक्स वेबर

(D) पॉल ॲपल्बी

58. Who said "Development Administration refers to organised efforts to carry out programmes or projects thought by those involved to serve development objectives" ?

(A) Fred W. Riggs

(B) L.D. White

(C) Donald Stone

(D) Hugo F. Reading

59. Which among the following statements is *incorrect* about morale ?

(A) a feeling of belongingness

(B) a sense of pride

(C) a belief in administration

(D) a spirit of determination

58. ''विकासाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यात सहभागी असलेल्यांनी नियोजिलेल्या कार्यक्रमांची व प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यासाठी चे संघटित प्रयत्न म्हणजेच विकास प्रशासन होय'' हे विधान कोणी केले ?

(A) फ्रेड डब्ल्यू. रिग्ज

(B) एल.डी. व्हाइट

(C) डॉनाल्ड स्टोन

(D) ह्यूगो एफ. रीडिंग

59. नीतिधैर्यविषयक खाली दिलेल्या विधानांतील कोणते विधान **चूक** आहे ?

(A) आपुलकीची भावना

(B) रास्त अभिमान

(C) प्रशासनावरील विश्वास

(D) निश्चयी वृत्ती

60. Give the correct answer using the codes given below :

Assertion (A) : The level of mass and elite partisan polarization in America is now quite high.

Reason (R) : The relatively poor are increasingly democratic and the rich republican.

Codes :

(A) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanation of (A)

(B) Both (A) and (R) are true but (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is true but (R) is false

(D) (A) is false but (R) is true

60. खाली दिलेल्या संकेत-सूचीचा वापर करून योग्य उत्तर द्या :

विधान (A) : अमेरिकेत जनसामान्य आणि अभिजन यांच्यातील पक्षीय ध्रुवीकरणाची पातळी सध्या उंचावली आहे.

कारण (R) : तुलनेने गरीब असलेले लोक वाढत्या प्रमाणात डेमोक्रॅटिक पक्षाची तर श्रीमंत लोकं रिपब्लिकन पक्षाची पाठराखण करतात.

संकेत-सूची :

(A) (A) व (R) दोन्ही बरोबर आहेत, आणि (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण आहे

(B) (A) व (R) दोन्ही बरोबर आहेत, पण (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण नाही

(C) (A) हे बरोबर आहे, पण (R) हे चूक आहे

(D) (A) हे चूक आहे, पण (R) हे बरोबर आहे

61. Maldives President Mohammed Nasheed lost power in a coup staged in :

(A) February 2011

(B) March 2011

(C) February 2012

(D) March 2012

62. In which of the following South Asian countries, India and the United States openly joined hands to manage domestic political conflict recently in early 2012 ?

(A) Pakistan

(B) Bangladesh

(C) Maldives

(D) Nepal

61. कधी झालेल्या बंडाळीत मालदीव्जचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद नशीद पदच्युत झाले ?

(A) फेब्रुवारी 2011

(B) मार्च 2011

(C) फेब्रुवारी 2012

(D) मार्च 2012

62. दक्षिण आशियातील कोणत्या देशात इ.स. 2012 च्या प्रारंभी भारत व युनायटेड स्टेट्स यांनी उघडपणे हातमिळवणी करून तेथील देशांतर्गत राजकीय संघर्ष आटोक्यात आणला ?

(A) पाकिस्तान

(B) बांगलादेश

(C) मालदीव्ज

(D) नेपाळ

63. Arrange the following events in a chronological ascending order during the post cold war period and select the correct answer from the codes given below :

(1) Civil war in former Yugoslavia

(2) Russia's invasion on Georgia

(3) US led invasion of Afghanistan

(4) Rwandan genocide

Codes :

(A) (3), (2), (1), (4)

(B) (1), (4), (3), (2)

(C) (4), (1), (2), (3)

(D) (2), (3), (4), (1)

64. Which school is responsible for the full development of critical theory ?

(A) Chicago School

(B) Toranto School

(C) Frankfurt School

(D) Copenhagen School

63. शीत युद्धोतर कालखंडामधील पुढील घटनांचा चढत्या क्रमाने ऐतिहासिक क्रम लावा आणि खाली दिलेल्या संकेत-सूचीचा साहाय्याने योग्य उत्तर निवडा :

(1) पुर्वाश्रमीच्या युगोस्लावियामधील अंतर्गत बंडाळी

(2) रशियाचे जॉर्जियावरील आक्रमण

(3) अमेरिकेच्या नेतृत्वाखालील अफगानिस्तान-वरील आक्रमण

(4) रवांडामधील वांशिक संहार

संकेत-सूची :

(A) (3), (2), (1), (4)

(B) (1), (4), (3), (2)

(C) (4), (1), (2), (3)

(D) (2), (3), (4), (1)

64. क्रिटीकल सिद्धान्ताच्या पूर्ण विकासात योगदान देणारे कोणते विद्याक्षेत्र आहे ?

(A) शिकागो विद्याक्षेत्र (स्कूल)

(B) टोरँटो विद्याक्षेत्र (स्कूल)

(C) फ्रँकफर्ट विद्याक्षेत्र (स्कूल)

(D) कोपनहेगन विद्याक्षेत्र (स्कूल)

65. Feminist theories of international relations :

(A) are essentially all variants of Marxism

(B) are solely concerned with the role of women in international relations

(C) bring a range of perspectives to bear on the problem of "Patriarchy"

(D) argue that war is a natural activity of men

66. Michael Doyle's democratic peace is based on three pillars :

(A) Conflict management, universal values and economic cooperation

(B) Peaceful conflict resolution, common values and economic cooperation

(C) Conflict resolution, consensus on values and free trade

(D) Conflict management, hegemony on values and economic cooperation

65. आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्त्रीवादी सिद्धांत :

(A) मार्क्सवादाचेच विविध प्रकार आहेत

(B) प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय संबंधात स्त्रियांच्या भूमिकेविषयी विचार करतात

(C) पुरुषसत्तेतून निर्माण होणाऱ्या प्रश्नांविषयी विविध परिप्रेक्षांची मांडणी करतात

(D) अशी भूमिका घेतात की युद्ध ही पुरुषांची नैसर्गिक कृती असते

66. मायकेल डॉयल प्रणीत लोकशाहीजन्य शांतता या संकल्पनेचे तीन आधारस्तंभ कोणते ?

(A) संघर्ष-व्यवस्थापन, सार्वत्रिक मूल्ये व आर्थिक सहकार्य

(B) शांततामय संघर्ष-निवारण, सामाईक मूल्ये व आर्थिक सहकार्य

(C) संघर्ष-निवारण, मूल्यविषयक सहमती आणि खुला व्यापार

(D) संघर्ष-व्यवस्थापन, मूल्यविषयक संप्रभुत्व व आर्थिक सहकार्य

67. The responsibility to protect as a principle has been used under which policy ?

(A) Underdevelopment

(B) Dependency

(C) Humanitarian Intervention

(D) Coercive Diplomacy

68. Match the following List I with List II and select the correct answer from the codes given below :

List I

(Missiles)

(*a*) Pershing II

(*b*) M-II

(*c*) Scud

(*d*) Brahmos

List II

(Countries)

(1) Iraq

(2) United States

(3) China

(4) India

Codes :

	(*a*)	(*b*)	(*c*)	(*d*)
(A)	(2)	(3)	(1)	(4)
(B)	(1)	(2)	(4)	(3)
(C)	(3)	(1)	(2)	(4)
(D)	(4)	(3)	(2)	(1)

67. कोणत्या धोरणात तत्त्वांचे संरक्षण करण्याची जबाबदारी वापरण्यात येते ?

(A) अर्धविकास

(B) परावलंबन

(C) मानवीय हस्तक्षेप

(D) जुलूमाचा राजनय

68. खाली दिलेल्या संकेत-सूचीच्या साहाय्याने यादी I व यादी II यांच्या जोड्या लावा :

यादी I

(क्षेपणास्त्रे)

(*a*) पेर्शिंग II

(*b*) एम-II

(*c*) स्कड

(*d*) ब्राम्होस

यादी II

(देश)

(1) इराक

(2) युनायटेड स्टेट्स

(3) चीन

(4) भारत

संकेत-सूची :

	(*a*)	(*b*)	(*c*)	(*d*)
(A)	(2)	(3)	(1)	(4)
(B)	(1)	(2)	(4)	(3)
(C)	(3)	(1)	(2)	(4)
(D)	(4)	(3)	(2)	(1)

69. What is the importance of the Dayton-Paris Accord ?

(A) End of World War I

(B) End of World War II

(C) Transfer of Spanish and Portuguese colonial possessions in 1966

(D) Ending the Yugoslav wars and division of Bosnia into legalized Bosnian/Croat/Serb entities in 1995

70. Which American President mentioned in his farewell address of corporations influencing governments as "Military Industrial Complex" ?

(A) Dwight Eisenhower

(B) Harry S. Truman

(C) John F. Kennedy

(D) L.B. Johnson

69. डेटन-पॅरिस कराराचे महत्त्व काय आहे ?

(A) पहिल्या महायुद्धाची समाप्ती

(B) दुसऱ्या महायुद्धाची समाप्ती

(C) स्पेन आणि पोर्तुगालच्या वासाहतिक संपत्तीचे 1966 मध्ये झालेले हस्तांतरण

(D) युगोस्लाव्हिया युद्धाची समाप्ती आणि 1995 साली झालेली बोस्नियाची बोस्निया/क्रोएट/सर्ब यामध्ये झालेली कायदेशीर विभागणी

70. कोणत्या अमेरिकन राष्ट्राध्यक्षाने आपल्या निरोपाच्या भाषणात उद्योगधंद्याच्या शासनावरील प्रभावाचा निर्देश करण्यासाठी 'लष्करी-औद्योगिक युती' हा शब्दप्रयोग वापरला ?

(A) ड्वायट आयसेनहॉवर

(B) हॅरी एस. ट्रूमन

(C) जॉन एफ. केनेडी

(D) एल.बी. जॉनसन

71. Over the years, which one of the following is identified as India's biggest internal security threat ?

(A) Naxalism

(B) Communal riots

(C) Human trafficking and drugs

(D) Insurgencies

72. Which one of the following militant groups plotted the military coup in 1988 in Maldives ?

(A) EPRLF

(B) EROS

(C) PLOTE

(D) LTTE

71. गेल्या अनेक वर्षापासून भारताच्या अंतर्गत सुरक्षिततेला धोका म्हणून खालीलपैकी कोणता घटक ओळखळा जातो ?

(A) नक्षलवाद

(B) जमातवादी दंगे

(C) मानवी व्यापार व अंमली पदार्थ

(D) घुसखोरी

72. 1988 मध्ये मालदीवमध्ये झालेल्या लष्करी उठावाची योजना कोणत्या जहाल गटाने केली ?

(A) ई.पी.आर.एल.एफ.

(B) ई.आर.ओ.एस.

(C) पी.एल.ओ.टी.ई.

(D) एल.टी.टी.ई.

73. Which of the following is a key factor to distinguish liberalism from realism ?

(A) All realists are anarchist who do not believe in the state

(B) Realism relishes conflict, not peace

(C) All liberals believe that human beings are rational enough to learn from their mistakes

(D) Realists see liberals as idealists who ignore the basic facts about human nature

73. उदारमतवाद व वास्तववाद यांच्यातील भेद स्पष्ट करणारा खालीलपैकी कोणता घटक आहे ?

(A) सर्व वास्तववादी अराज्यवादी असून त्यांचा राज्यसंस्थेवर विश्वास नाही

(B) वास्तववादी शांतता नव्हे तर संघर्षाला धन्यता मानतात

(C) सर्व उदारमतवादी असे मानतात की सर्व माणसे विवेकी असून ते त्यांच्या चुकांमधून शिकतात

(D) वास्तववादी, उदारमतवाद्यांकडे एक चिद्वादी म्हणून बघतात, जे मानवी स्वभावाच्या मुख्य वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करतात

74. Give the correct answer by using the codes given below :

Assertion (A) : Edward Said observed countries that emerged from colonialism, that there is need for a reconquest of space through a new, decolonized identity.

Reason (R) : Political control of their own territories permits the nations of the former colonial world to be selective in what they accept or reject of western culture.

Codes :

(A) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanation of (A)

(B) Both (A) and (R) are true but (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is true but (R) is false

(D) (A) is false but (R) is true

74. खाली दिलेल्या संकेत-सूचीचा वापर करून योग्य उत्तर द्या :

विधान (A) : एडवर्डच्या वासाहतिक जोखडातून मुक्त झालेल्या राष्ट्रांना स्वतंत्र ओळख स्वीकारून नवा अवकाश काबीज करण्याची गरज आहे.

कारण (R) : पुर्वाश्रमीच्या वसाहतींना त्यांच्या भूप्रदेशावर त्यांची सत्ता स्थापन झाल्यामुळे पाश्चात्य संस्कृती स्वीकारायची की नाकारायची हे स्वातंत्र्य मिळाले आहे.

संकेत-सूची :

(A) दोन्ही (A) व (R) बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे

(B) दोन्हीं (A) व (R) बरोबर आहेत पण (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही

(C) (A) हे योग्य आहे पण (R) हे अयोग्य आहे

(D) (A) हे अयोग्य आहे पण (R) हे योग्य आहे

75. The US-India proximity in the multipolar world in general and Asia in particular is significant because of :

(A) China's rise as a counter weight to the USA and the US-India convergence in containing China

(B) US-Pakistan cooling off and no role in the Global War on Terror (GWOT)

(C) The US recognition of India's growing power as supportive to US interests in the Asia-Pacific region

(D) Extension of US policy in South East

75. सर्वसाधारणपणे अमेरिका-भारत यांची जवळीक बहुध्रुवी जगात व विशेषत: आशिया खंडात महत्त्वाची आहे कारण :

(A) अमेरिकेच्या वर्चस्वाला शह देत झालेला चीनचा उदय आणि चीनला रोखण्यासाठी झालेली अमेरिका-भारत जवळीक

(B) अमेरिका-पाकिस्तान यांच्यातील थंड झालेले संबंध आणि दहशतवाद विरोधी जागतिक युद्धातील कोणतीही भूमिका नसणे

(C) भारताच्या वाढत्या सत्तेची अमेरिकेने घेतलेली दखल आणि त्यास पूरक अमेरिकेचे आशिया-प्रशांत प्रदेशातील हितसंबंध

(D) दक्षिण-पूर्व आशिया खंडातील अमेरिकी धोरणाचा विस्तार

ROUGH WORK

ROUGH WORK